नि.फौ.ख.क्र.२०२८/२०१५

**निशाणी १८**

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानीः-**

**साक्षीदाराला मराठी भाषा समजत नसल्यामुळे हिंदी भाषेमध्ये प्रश्न विचारून मराठी भाषेमध्ये त्याची साक्ष नोंदविण्यात आली.**

**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

**पुर्ण नांव** – कमलेशकुमार हरीराम अग्रवाल

**वय**– अंदाजे ५८ वर्षे, **धंदा** – किराणा दुकान

**रा.** चिखली ले आऊट, नागपूर.

**साक्षीदाराचा सरतपास सरकारी अभियोक्ता श्रीमती ममता आवारीवार यांचेद्वारा शपथेवर सुरुः-**

दिनांक १४.०१.२०१४ रोजी मी माझे किराणा दुकान नेहरू पुतळा, मस्कासाथ, ईतवारी, नागपूर येथील दुकान रात्री ०९.०० वाजता बंद करून नेहमीप्रमाणे घरी गेलो होतो. माझ्या दुकानासमोर एक नारळाचे देखील दुकान आहे त्या ठिकाणी सकाळीच नारळ घेवून जाण्याकरिता लेबर येत असतात. दुस-या दिवशी सकाळी मला सकाळी ०४.३०-०५.०० वाजता तेथील एका लेबरने फोन करून सांगितले की, माझ्या दुकानाचा कुलूप तुटलेला असून त्याचे शटर देखील उघडे आहे. त्यानंतर लगेच मी माझ्या दुकानात गेलो. त्यावेळी माझ्या दुकानातील सर्व सामान अस्तव्यस्त पडलेले होते व काही सामान चोरी गेलयाचे आढळून आले. किराणा सामानामधील लवंगचे पाच बोरे (एका बोरीचे वजन चाळीस किलो असते), बडी ईलायचीचे तीन बोरे (इंचा) (एका बोरीचे वजन पन्नास किलो असते)-एका बोरीमध्ये दहा किलोच्या पाच बोरी असते, कलमी मसाल्याचे दोन बोरी (एका बोरीचे वजन तीस किलो असते) व काही किराणाच्या बारीक वस्तू देखील चोरी गेल्या होत्या. त्यानंतर मी लकडगंज पोलीस स्टेशन येथे फोन करून सदर घटनेची माहिती दिली होती. त्यानंतर पोलीस घटनास्थळी आले होते. त्यानंतर पोलीसांनी घटनेची पाहणी केली, माझा जबाब नोंदविला, तसेच समोर असणारा नारळवाला याचा देखील जबाब नोंदविला. आता मला माझा जबाब दाखवला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी १९** देण्यात येते.

हितेश नानक आसवानी हा सराईत आरोपी असून तो एका दुस-या चोरीच्या गुन्हयामध्ये जेलमध्ये होता. तो घटनेच्या आधी माझ्या दुकानासमोरून गेला होता व त्याने माझे दुकान पाहिले होते. हितेश याचे देखील दुकान असल्याने मी त्याला ओळखतो. घटनेनंतर मला हितेश नानक यावर संशय आला होता. मी उपरोक्त संपुर्ण बाब पोलीसांना सांगितली होती. त्यानंतर मला पोलीसांनी पुन्हा पोलीस स्टेशनमध्ये बोलाविले होते त्यावेळी हितेश हा पोलीस स्टेशन मध्ये होता. पोलीसांनी मला तो दाखवला होता. त्याच्या सांगण्याप्रमाणे चोरी केलेला उपरोक्त किराणा माल त्याने ज्या ठिकाणी ठेवला आहे व विकला आहे पोलीसांनी त्या ठिकाणावरून जप्त केला होता. पोलीसांनी सदर घटनेबाबत सीसीटीव्ही फुटेज प्राप्त केले होते. त्याची पाहणी करत असतांना मी त्या ठिकाणी हजर होतो. त्यावेळी हितेश सोबत आणखी दोन लोक असल्याचे दिसून आले होते. तसेच चोरी झालेला माल हा गल्लीमधून सांडत गेल्याने तो कोणत्या दिशेने गेला

आहे त्याचा तपास लागला होता.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास- आरोपीचे वकील श्री. पटले यांचेद्वारा शपथेवर सुरुः-**

मी दिनांक १५.०१.२०१५ रोजी सकाळी सदर घटनेची तक्रार दिली होती. मी निशाणी २९ वरील माझा जबाब वाचून पाहिला होता. माझ्या जबाबामध्ये पोलीसांनी चोरी गेलेल्या मालाची प्रत्येकी व एकूण संख्या लिहली होती. ‘किराणा सामानामधील लवंगचे पाच बोरे (एका बोरीचे वजन चाळीस किलो असते), बडी ईलायचीचे तीन बोरे (इंचा) (एका बोरीचे वजन पन्नास किलो असते)-एका बोरीमध्ये दहा किलोच्या पाच बोरी असते, कलमी मसाल्याचे दोन बोरी (एका बोरीचे वजन तीस किलो असते) व काही किराणाच्या बारीक वस्तू देखील चोरी गेल्या होत्या' ही बाब मी पोलीसांनी जबाब देतेवेळेस सांगितली होती. हे म्हणणे खरे आहे की, उपरोक्त बाब ही माझ्या जबाबामध्ये नमूद केलेली नाही ती पोलीसांनी का नमूद केली नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दुकानामध्ये कधीही कोणतेही सामान चोरी झाले नव्हते म्हणून माझ्या जबाबामध्ये ते नमूद केलेले नाही. मला पोलीसांनी माझे दुकान किती वाजता बंद करतो याबाबत विचारले नव्हते. मी पोलीसांना जबाब देतेवेळेस माझे किराणा दुकान असल्याबाबत सांगितले होते. तसेच सदरची बाब माझे जबाबात नमूद केल्याची मी पाहिले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे किराणा दुकान असल्याबाबत माझे जबाबामध्ये नमूद केलेले नाही ते पोलीसांनी का नमूद केले नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मला सकाळी ०४.३०-०५.०० चे सुमारास हमालाचा फोन आलेबाबत मी पोलीसांना जबाब देतेवेळेस सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरची बाब माझे जबाबामध्ये नमूद केलेली नाही. ती पोलीसांनी का नमूद केली नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. पोलीसांनी मला चोरी गेलेल्या मालाची कोणतेही बिल मागितले नव्हते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, सदरची बिल मी न्यायालयात दाखल केली आहेत.

हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १४.०१.२०४ रोजी रात्रीच्या सुमारास माझ्या दुकानामध्ये कोणत्याही प्रकारची चोरी झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला घटनेबाबतचे सीसीटीव्ही फुटेज दाखविले होते. तसेच पुन्हा पोलीस स्टेशनला बोलावून चोरी गेलेला माल हितेश याच्यामार्फत जप्त केला होता हे मी खोटे सांगत आहे. माझ्या दुकानाचा विमा काढलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, विम्याचे पैसे मिळणेकरिता मी खोटी फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

RAHUL KESHAVRAO GAIKWAD
Digitally signed by RAHUL KESHAVRAO GAIKWAD
Date: 2024.07.03 17:19:02 +0530

(राहूल के. गायकवाड)

दिनांकः– ०३.०७.२०२४

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र.१),

नागपूर.